MHKO050013782018

अंतिम हुकूमनामा अर्ज क्रं.६/ २०१८, नि. १८

**बाळ अबुबकर मुल्ला–मुल्लाणी**
**विरुध्द**
**श्रीमती खातूनबी बाबासो मुल्ला–मुल्लाणी वगैरे**

## निशाणी क्रं.१८ वरील आदेश
(दि.१६/०३/२०२२)

प्रस्तुतचा अर्ज मूळ अर्जदार श्री.बाळ अबुबकर मुल्ला याने दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ५४ अन्वये मा.जिल्हाधिकारी यांचेकडे त्याचा दावा मिळकतीमधील ५/१४ हिस्सा तुटक होवून मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. नि.१९ अन्वये वि.प. यांनी प्रकरण अपीलात प्रलंबित असल्याने मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविता येणार नाही असे कथन केले आहे.

३. आजतागायत सदर प्रकरणात मा.जिल्हा न्यायालय, इचलकरंजी अथवा मा.मुंबई उच्च न्यायालय यांचेमार्फत कोणताही स्थगिती आदेश प्राप्त झालेला नाही. यातील दावा मिळकत ही शेत मिळकत असल्याने त्याचे सरस निरस मानाने वाटप होवून व तुटक हिस्सा देण्याचे सर्वतोपरी अधिकार जिल्हाधिकारी यांचेकडे असल्याने सदरचा हुकूमनामा मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे न्यायोचित आहे. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

मूळ नियमिती दिवाणी दावा क्रं.२१३/२०१२ यातील हुकूमनामा दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम ५४ प्रमाणे मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सरस निरस मानाने वाटप तसेच तुटक कब्जा देणेकरिता पाठविणेत यावा. सोबत हुकूमनाम्याची साक्षांकित प्रत पाठविणेत यावी.

SAPNA ARUN HARNE
Digitally signed by SAPNA ARUN HARNE
Date: 2022.03.16 18:02:29 +0530

दि.१६/०३/२०२२ (एस.ए.हरणे)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इचलकरंजी.